जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ३३५ दिनांक - २१/०५/२०२१**

हडपसर पोलीस स्टेशन पुणे

**जबरी चोरीतील रेकॉर्डवरिल गुन्हेगारांकडुन कि.रु. ०४,६८,४००/- चे सोन्याचे दागिने, मोबाईल फोन, मोटर सायकल, एल.सी.डी.टी.व्ही. इत्यादी हस्तगत करून रेकॉर्डवरिल गुन्हेगारांचे आवळल्या मुसक्या..**

मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री अमिताभ गुप्ता यांनी पोलीस आयुक्त पुणे शहर म्हणून पदभार स्विकारल्यानंतर शहरातील पुणे शहरातील टोळी गुन्हेगार, बेकायदेशिर धंदे करणारे,अंमली पदार्थ विक्रीचे रॅकेट चालविणारे, तसेच शरीर व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत करणारे सराईत गुन्हेगारांवर कठोर कारवाई करुन त्यांचे समूळ उच्चाटन करणे याबाबत आदेश सर्व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना दिले आहेत.

हडपसर पोलीस स्टेशन हद्दीत १) दिनांक १५/०५/२०२१ रोजी सकाळी ०६.०० च्या सुमारास मगरपट्टा सिटीमध्ये एका जेष्ठ नागरीकांची वॉकिग करतेवेळी दोन तोळयाची चेन खेचून घेवून गेल्याने जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला होता. सदरचा दाखल गुन्हा हा मगरपट्टा सारख्या उच्चभ्रू सोसायटीमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था असताना घडला होता. दोन्ही आरोपी हे अज्ञात होते. त्यांनी मोटार सायकलचा वापर केला असल्याचे सी.सी.टी.व्ही फुटेजवरून निष्पन्न झालेले होते.

२) दिनांक १८/०५/२०२१ रोजी सकाळी ०६.१५ च्या सुमारास पुन्हा भोसले गार्डन येथे अज्ञात तीन इसमांनी मॉर्नींग वॉक करणा-या एका महिलेला कोयता दाखवून तिच्या गळ्यातील चेन ओढून नेण्याचा प्रयत्न केला. परंतु महिलेच्या सतर्कतेमुळे त्यांचा तो प्रयत्न यशस्वी झाला नाही.

३) त्याच दिवशी सकाळी पहाटे वानवडी पोलीस ठाणेच्या हद्दीत बी.टी.कवडे रोडवर टेंम्पो चालकाला कोयत्याचा धाक दाखवून टेंम्पोची काच फोडून, ड्रायव्हरवर कोयत्याने वार करून त्याचा मोबाईल व रोख रक्कम चोरीस गेलेली होती. घटनास्थळाचे फुटेज पाहीले असता,त्यामध्ये तिन इसम हे लाल रंगाच्या पॅशन प्रो मोटार सायकलवरून येवून त्यांनी गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झालेले होते सदर गुन्हयाचा तपास हडपसर पोलीस ठाणेकडील तपास पथके करीत होती.

मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाप्रमाणे हडपसर पोलीस ठाणेकडील तपास पथकाचे एकुण तिन पथके तयार करून अज्ञात आरोपींचा व मोटार सायकलचा शोध घेत असताना,तपास पथकाचे पोशि.शाहिद शेख, पोशि.शशिकांत नाळे यांना मिळालेल्या बातमीवरून वरील गुन्हयातील संशयित वर्णनाचे जबरी चोरीचे गुन्हे करणारे तिन इसम व वापरलेली मोटार सायकलवरून नविन म्हाडा,हडपसर पुणे या ठिकाणी येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली. त्याप्रमाणे सदर परिसरात तिन्ही पथके एकत्रित करून सापळा लावला असता,मिळालेल्या बातमीतील तिन्ही संशयीत इसम हे नविन म्हाडाकडे जाणा-या रोडने येताना दिसले, त्यांना तपासपथकातील अंमलदार यांनी ओळखलेनंतर त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला परंतु ते न थांबता मोटारसायकल वरून भरधाव वेगाने जात असताना,पथकातील अंमलदारांने त्यांचा पाठलाग करून त्यांना न्यू इंग्लिश स्कुलजवळ पकडुन,त्यांचेकडे विचारपूस करून त्यांची नाव पत्ते विचारले असता त्यांनी त्यांची नावे १)अभिजीत ऊर्फ दादया अशोक रणदीवे,वय-२१ वर्ष,रा.म्हाडा कॉलनी हडपसर पुणे. २)सतीश आण्णाजी केदळे,वय ३२ रा. म्हाडा कॉलनी हडपसर,पुणे असे सांगून त्यांचेसोबत एक विधीसंघर्षग्रस्त

बालक देखील मिळून आला. त्यानंतर वरील तिन्ही संशयिताना हडपसर पोलीस ठाणे येथे घेवून जावून त्यांना विश्वासात घेवून अधिक तपास केला असता त्यांनी त्यांचा साथीदार ३)नोएल ऐलेन शबान वय २० वर्ष रा.कोरेगाव पार्क, सर्कीट हाऊस जवळील ब्रिजखाली बंडगार्डन पुणे यांचेसह हडपसर, वानवडी, कोंढवा, कोरेगाव पार्क, पोलीस ठाणेच्या हद्दीत पहाटेच्या वेळेस रस्त्याने जाणारे टेंम्पो चालक, ट्रक ड्रायव्हर, मॉर्नींग वॉक करीता व जाणारे इसम यांना कोयत्याचा धाक दाखवून तसेच काहींना जखमी करून त्यांचेकडून मोबाईल फोन, रोख रक्कम, असे जबरी चोरीचे गुन्हे केले असल्याचे कबूली दिली. तसेच त्यांनी हडपसर पोलीस ठाणे हद्दीत जुना म्हाडा येथे दोन ठिकाणी घरफोड्या केल्या असल्याची देखील कबूली दिलेली आहे. **तसेच वरील तिन्ही आरोपींकडून महागड्या किंमतीचे एकुण २४ चोरीचे मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले असून** त्याबाबत अधिक तपास चालू आहे.

हडपसर पो स्टे गु.र.नं ३६५/२०२१ भा.दं.वि.कलम ३९२,३४, गु.र.नं ३७३/२०२१ भा.दं.वि.कलम ३९३,३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५, गु.र.नं ३६८/२०२१ भा.दं.वि.क ४५४,४५७,३८०, गु.र.नं ३७७/२०२१ भा.दं.वि.क ४५४,४५७,३८०, वानवडी पो स्टे गु.र.नं.१६६/२०२१,भा.दं.वि.कलम ३९४,३४१,४२७,५०४,५०६,भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५, कोंढवा पो स्टे गु.र.नं ३७५/२०२१ भा.दं.वि.कलम ३९२,३४१,३४, को.पार्क पो स्टे १०२/२०२१ भा.दं.वि.कलम ३७९ असे एकुण ०७ गुन्हे वरील चारही संशयितांकडून तपासा दरम्यान उघड झाले आहेत.

नमुद आरोपींकडून वरिल गुन्ह्यातील ०४,६८,४००/- कि.रु.चे त्यामध्ये सोन्याचे दागिने, महागड्या किंमतीचे मोबाईल फोन, मोटर सायकल, एल.सी.डी.टी.व्ही. इत्यादी हस्तगत करण्यात आलेला आहे. वरील गुन्हयाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत गायकवाड हे करीत आहेत. **आरोपी हे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्यांचेवर वेगवेगळया पोलीस ठाणेमध्ये मालमत्तेचे गुन्हे दाखल आहेत.**

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमिताभ गुप्ता, मा.पोलीस सह-आयुक्त डॉ.रविंद्र शीसवे, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.नामदेव चव्हाण, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-५,पुणे,श्रीमती.नम्रता पाटील यांचे मागदर्शनाखाली मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे, श्री.कल्याणराव विधाते, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर, श्री. बाळकृष्ण कदम, मा. पो.निरी.(गुन्हे),श्री.राजु अडागळे, मा.पो.निरी.(गुन्हे),श्री.दिगबंर शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक,हनुमंत गायकवाड, पोलीस उप निरीक्षक,सौरभ माने, पोलीस हवालदार,प्रदीप सोनवणे, प्रताप गायकवाड, गणेश क्षिरसागर, पोलीस नाईक, अविनाश गोसावी, संदीप राठोड, समीर पांडुळे, पोलीस शिपाई ,शाहीद शेख, अकबर शेख, शशिकांत नाळे, सचिन जाधव, प्रशांत दुधाळ, निखील पवार, प्रशांत टोणपे यांचे पथकाने करुन प्रशंसनीय कामगिरी केली आहे.